


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हॉट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २४७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१९ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## येरवड्यातील खून प्रकरण उघड, २४ तासांत दोन आरोपी जाळ्यात

**दि.१८, पुणे :** पुणे शहरातील येरवडा परिसरात घडलेल्या खून प्रकरणाचा वेगाने तपास करत गुन्हे शाखेच्या युनिट-४ पथकाने अवघ्या २४ तासांत दोन आरोपींना अटक करून मोठी कामगिरी बजावली आहे. या कारवाईमुळे परिसरातील भीतीचे वातावरण कमी झाले आहे.

१५ एप्रिल रोजी रात्री कॉमर्स झोन परिसरात गौरव तेलंगी याचा धारदार शस्त्र आणि सिमेंटच्या विटेने निर्घृण खून करण्यात आला होता. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांनी तातडीने तपास सुरू केला.

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी मोरगाव-बारामती रोड परिसरात सापळा रचला. पोलीस उपनिरीक्षक वैभव मगदूम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने संशयितांना अचूक ओळखून घेराव घालत अटक केली. अटकेत घेतलेल्या आरोपींची नावे तोफिक शेख (वय २१) आणि भारत शिंदे (वय २३) अशी आहेत.

चौकशीत जुन्या वादातूनच हा खून केल्याची कबुली आरोपींनी दिली आहे. या कारवाईत गुप्त माहिती मिळवून देत आणि प्रत्यक्ष धाड टाकून आरोपींना अटक करण्यात पोलीस हवालदार अमजदखान शेख व जहांगीर पठाण यांनी पुढाकार घेत महत्त्वाची भूमिका बजावली. संपूर्ण कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पुढील तपास विश्रांतवाडी पोलीस करत आहेत.

## पुण्यानंतर आता छत्रपती संभाजीनगरमध्ये गँगवॉर

**दि.१८, छ.संभाजीनगर :** शहरातील पुंडलिकनगर परिसरातील हनुमान नगर चौकात गुरुवारी रात्री टोळीयुद्धाच्या वादातून भररस्त्यात गोळीबार झाल्याची खळबळजनक घटना घडली. सराईत गुन्हेगार पवन दिवेकर आणि त्याच्या पीडी कंपनीने भरवस्तीत दहशतीचे तांडव करत दोन राऊंड फायर केले. सुदैवाने, शेकडो नागरिकांची उपस्थिती असूनही या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पवन दिवेकर राहणार न्याय नगर असे गोळीबार करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार, रांजणे आणि साळवे या दोन गटात गेल्या दोन दिवसांपासून सार्वजनिक कार्यक्रमातील वादावरून ठिणगी पडली होती. गुरुवारी रात्री हे दोन्ही गट एकमेकांसमोर आले असता वाद विकोपाला गेला. यावेळी साळवे याने आपल्या मदतीला कुख्यात गुन्हेगार पवन दिवेकर याला बोलावून घेतले.


**सिनेस्टाईल एन्ट्री अन् फायरिंगचा थरार**

नुकताच कारागृहातून बाहेर आलेला पवन दिवेकर हातात बिअरची बाटली घेऊन शिवीगाळ करत घटनास्थळी दाखल झाला. त्याने अत्यंत थंड डोक्याने टपरीवरून गुटखा खरेदी करून तोंडात टाकला आणि त्याचवेळी कंबरेला लावलेला गावठी कट्टा काढून रांजणे गटाला धमकावण्यास सुरुवात केली. रांजणे गटाचा विरोध वाढताच संतापलेल्या दिवेकर याने गर्दीच्या मधोमध उभे राहून हवेत दोन गोळ्या झाडल्या. अचानक झालेल्या गोळीबारामुळे परिसरात एकच पळापळ झाली.

**पोलिसांची धडक कारवाई !**

घटनेची माहिती मिळताच पुंडलिकनगर पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने सायरन वाजवत घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांच्या गाड्या पाहताच पवन दिवेकर आणि त्याचे साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले, मात्र पोलिसांनी साळवे याला ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखेचे निरीक्षक गजानन कल्याणकर आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी केली असून आरोपींच्या शोधासाठी विविध पथके रवाना केली आहेत.

## महिलांची स्वप्नं चिरडली, विरोधकांना पापाची शिक्षा नक्की मिळेल



**दि.१८, नवी दिल्ली :** लोकसभेत महिला आरक्षण विधेयक मंजूर न झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील महिला वर्गाची माफी मागितली. विरोधी पक्षांनी नारी शक्तीचं उड्डाण रोखलं. त्यांची स्वप्न चिरडली. या पक्षांनी त्यांच्या स्वार्थी राजकारणापोटी महिलांना त्यांचे अधिकार मिळू दिले नाहीत, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. मोदींनी देशवासीयांशी संवाद साधला. त्यातून त्यांनी विरोधकांना लक्ष्य केलं.

'संसदेत महिला आरक्षण विधेयकावर मतदान झालं. तेव्हा विरोधकांनी सुधारणा हाणून पाडल्या. काँग्रेस , तृणमूल काँग्रेस , समाजवादी पक्ष, द्रमुक यांनी विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. त्यामुळे विधेयक मंजूर होऊ शकलं नाही. या पक्षांना स्वार्थापोटी देशाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. विधेयकाला विरोध करणारे देशाचे गुन्हेगार आहेत. त्यांनी महिला आरक्षण विधेयकाची भ्रूणहत्या केली,' अशा शब्दांत मोदींनी काँग्रेससह अन्य विरोधकांचा समाचार घेतला. आम्ही अतिशय स्वच्छ हेतूनं महिला आरक्षण विधेयक आणलं. पण विरोधकांनी त्यांच्या स्वार्थासाठी महिलांना त्यांचे अधिकार मिळून दिले नाहीत. महिला आरक्षण विधेयक मंजूर होऊ शकलं नाही. त्यामुळे मला वाईट वाटलं. पण त्याचवेळी विरोधक जल्लोष साजरा करत होते. टेबल वाजवून आनंद व्यक्त करत होते. या पक्षांना या सगळ्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा मोदींनी दिला. काँग्रेस सुधारणांना कायम विरोध करत आली आहे. महिला आरक्षण असो वा कलम ३७० किंवा समान नागरी कायदा अथवा सीएए, ट्रिपल तलाक, वक्फ बोर्डासारखे मुद्दे, काँग्रेसनं नेहमी विरोध केला, अशा शब्दांत मोदींनी विरोधी बाकांवरील सगळ्यात मोठ्या पक्षाला लक्ष्य केलं. काही पक्षांसाठी त्यांचा पक्ष देशहितापेक्षा महत्त्वाचा झाला आहे. यामुळे महिलांचं आणि देशाचं नुकसान झालं आहे. एकविसाव्या शतकातील महिला जागरुक आहेत. त्यांना या सगळ्याची जाणीव आहे. महिला सगळं काही विसरु शकते. पण तिचा अपमान कधीही विसरत नाही. त्यामुळे देशातील महिला ही घटना कदापि विसरणार नाहीत. महिला आरक्षणाला विरोध करणारे नेते जेव्हा लोकांमध्ये जातील, तेव्हा त्यांना उत्तरं द्यावी लागतील. महिलांच्या अधिकाऱ्यांना विरोध करणाऱ्या पक्षांना याची शिक्षा या पक्षांना नक्की मिळेल. या पक्षांना जनताच धडा शिकवतील, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये आता मराठी भाषा सक्तीची

## उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई होणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१८, मुंबई :** राज्यात मराठी भाषेच्या सक्तीसाठी राज्य सरकार कडक पावले उचलताना दिसत असून रिक्षा टॅक्सी चालकांच्या मराठी भाषेच्या सक्तीनंतर आता राज्यभरातील सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा विषय सक्तीची करण्याचा निर्णय घेऊन त्याविषयीचा कायदा देखील पारित करण्यात आला आहे. या कायद्याची अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी शासनाने कार्यपद्धती निश्चित केली आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भात शासन निर्णय प्रसिद्ध केला असून, उल्लंघन करणाऱ्या शाळांना दंड ठोठावण्यासह अंतिम टप्प्यात मान्यता रद्द करण्याची तरतूद देखील करण्यात आली आहे.



महाराष्ट्र राज्यात २०२० पासून मराठी भाषा विषय सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये अनिवार्य करण्यात आला आहे. तथापि, अद्यापही काही खासगी, विशेषतः इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मराठी विषय शिकविला जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा विषयाची सक्ती अधिक प्रभावीपणे अंमलात येण्यास मदत होणार असून, अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मराठी विषय न शिकवणाऱ्या शाळांची प्रथम तपासणी केली जाईल. उल्लंघन आढळल्यास नोटीस देऊन १५ दिवसांत खुलासा मागविला जाईल. समाधानकारक उत्तर न मिळाल्यास दंड आकारला जाईल. आदेशाचे पालन न केल्यास पुढील टप्प्यात शाळेची मान्यता रद्द करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल.

मराठी विषय सक्तीचा असूनही अंमलबजावणी न करणाऱ्या शाळांवर एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय संबंधित शाळेला तत्काळ किंवा पुढील शैक्षणिक वर्षापासून मराठी विषय सुरू करण्याचे आदेश दिले जातील. वारंवार उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई केली जाईल.

मराठी आध्यापन सुरू आहे की नाहीयासाठी तपासणी पथक शाळांमध्ये मराठी विषयाचे अध्यापन सुरू आहे की नाही, याची तपासणी शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी व शिक्षण निरीक्षक यांच्या पथकांमार्फत केली जाईल. या पथकात मराठी विषयातील अनुभवी शिक्षकाचा समावेश करणे बंधनकारक राहणार आहे, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

उपसंचालकांच्या निर्णयाविरुद्ध संबंधित शाळा व्यवस्थापनाला ३० दिवसांच्या आत शिक्षण संचालकांकडे अपील करता येणार आहे. संचालक दोन महिन्यांच्या आत सुनावणी घेऊन अंतिम निर्णय देतील. तरीही आदेशाचे पालन न केल्यास प्रकरण पुढील कारवाईसाठी शिक्षण आयुक्तांकडे पाठवले जाईल. दरम्यान शासनाच्या आदेशांचे पालन न करणाऱ्या अशा शाळांच्या विरोधात अखेरची कठोर कारवाई म्हणून मान्यता रद्द करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. शिक्षण आयुक्तांच्या स्तरावर सुनावणी घेऊन हा कठोर निर्णय घेतला जाईल. त्यानंतर पुढील शैक्षणिक वर्षापासून संबंधित शाळेची मान्यता कायमचीच रद्द केली जाऊ शकते.

## मंत्रालयात मंत्र्यांसोबत आता एकाच व्यक्तीला प्रवेश, उपस्थितीसाठी मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी अनिवार्य

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, मुंबई :** मंत्रालयात होणारी कार्यकर्त्यांची जत्रा आणि मंत्र्यांच्या मागे धावणारी पीएंची फौज आता या सगळ्याला चाप बसणार आहे. महाराष्ट्र सरकारने मंत्रालयातील अफाट गर्दी टाळण्यासाठी एक अत्यंत कडक आणि मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्र्यांसोबत फक्त एकाच व्यक्तीला प्रवेश दिला जाणार आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी याबाबतचे कडक निर्बंध जारी केले असून, सर्व मंत्र्यांना याबाबतच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

**काय आहे नेमकं प्रकरण?**

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात जणू जत्रा भरलेली असते. मतदारसंघातील प्रश्न, कार्यकर्त्यांची कामं आणि पदाधिकाऱ्यांची लगबग यामुळे मंत्रालयाचा सहावा आणि सातवा मजला अक्षरशः गजबजलेला असतो. या गर्दीमुळे कामकाजात मोठा अडथळा निर्माण होत असल्याचं निरीक्षण मुख्य सचिवांनी नोंदवलं आहे. याच गर्दीला 'ब्रेक' लावण्यासाठी आता सरकारने नियमावली कडक केली आहे.

**नवे नियम**

**केवळ एकच व्यक्ती :** मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्र्यांसोबत त्यांच्या कार्यालयातील केवळ एकाच व्यक्तीला मंत्रिमंडळ सभागृहापर्यंत एन्ट्री मिळेल. इतर पीए किंवा कार्यकर्त्यांना बाहेरच थांबावं लागेल.



**मुख्यमंत्र्यांची परवानगी अनिवार्य**

जर एखाद्या विशेष व्यक्तीला बैठकीला उपस्थित राहायचं असेल, तर मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. त्याचे कागदपत्र सुरक्षा अधिकाऱ्यांना दाखवल्याशिवाय आत पाऊल ठेवता येणार नाही.

**आमदार-खासदारांसाठी काय नियम?**

जर बैठक 'सह्याद्री' अतिथीगृहावर असेल, तर फक्त आमदार आणि खासदारांनाच वेटिंग रूममध्ये बसता येईल. त्यांच्या स्वीय सहायकांना परिसरात फिरण्यासही मनाई करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या आधी आणि नंतर २ तास सातव्या मजल्यावर किंवा मंत्रिमंडळ सभागृहात कोणतीही इतर बैठक घेता येणार नाही.

**गर्दीचा प्रश्न खरंच सुटणार?**

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व बड्या सचिवांच्या उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीत गांभीर्य राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्र्यांच्या अवतीभोवती घोटाळणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गराड्यामुळे अनेकदा महत्त्वाच्या फायलींची ने-आण करताना अडथळे येतात. आता या नव्या निर्णयामुळे मंत्रालयात 'फिल्डिंग' लावणाऱ्या कार्यकर्त्यांना मोठा धक्का मानला जात आहे.

## पुणे विमानतळावर मध्यरात्री मोठा अनर्थ टळला, फायटर विमान लँडिंगदरम्यान धावपट्टीवर अडकलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर मध्यरात्री सुमारे १२:२५ वाजता भारतीय हवाई दलाच्या (खअऋ) एका फायटर विमानाशी संबंधित तांत्रिक बिघाडामुळे विमानसेवा काही काळासाठी विस्कळीत झाली. लँडिंगदरम्यान विमानाच्या अंडरकॅरेज (चाकांच्या यंत्रणा) मध्ये बिघाड झाल्याने विमान धावपट्टीवरच अडकले आणि रनवे तात्पुरता बंद करण्यात आला.

या घटनेनंतर सुरक्षेच्या कारणास्तव सर्व नागरी उड्डाणे तात्काळ थांबवण्यात आली. विमानतळ प्रशासन, एअर ट्रॅफिक कंट्रोल आणि हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम सुरू केले.

**जीवितहानी नाही....**

सुदैवाची बाब म्हणजे या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. विमानातील सर्व एअरक्रू सुरक्षित असून नागरी मालमत्तेचेही कोणतेही नुकसान झालेले नाही, अशी अधिकृत माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे मोठा अनर्थ टळल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, काही वेळेसाठी धावपट्टीवर अडकलेले विमान आणि अचानक झालेल्या हालचालीमुळे अपघात किंवा विमान कोसळल्याची शक्यता काही काळ वर्तवण्यात येत होती. मात्र, हवाई दलाकडून अशा कोणत्याही अपघाताची अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. प्राथमिक माहितीप्रमाणे ही केवळ तांत्रिक बिघाडाची घटना असल्याचे सांगण्यात आले आहे.

**युद्धपातळीवर दुरुस्तीचं काम...**

या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी रात्रभर युद्धपातळीवर काम करण्यात आले. विमान धावपट्टीवरून हटवण्यात आले आणि आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली. विमानतळ संचालक संतोष ढोके यांच्या माहितीनुसार परिस्थिती सुरळीत करण्यासाठी ४ ते ५ तासांचा कालावधी लागू शकतो, असे सुरुवातीला सांगण्यात आले होते.

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही या घटनेवर लक्ष ठेवून असल्याचे सांगत विमानतळ प्रशासन आणि हवाई दलाशी सातत्याने संपर्कात असल्याची माहिती दिली.

**विमानतळावरील परिस्थिती पूर्ववत**

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सकाळी पोस्ट करून परिस्थिती पूर्ववत झाल्याची माहिती दिली आहे. धावपट्टीवरील दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर सकाळी ७:३० पासून डिपार्चर फ्लाइट्स पुन्हा सुरू करण्यात आल्या आहेत, तर सकाळी ८:०० पासून आगमन सेवा सुरू होणार आहेत. संपूर्ण यंत्रणांनी मिळून काम पूर्ण केल्यानंतर विमानसेवा हळूहळू सामान्य होत आहे. दिवसभरात हवाई वाहतूक पूर्णपणे पूर्ववत होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.




## ‘जीवन’ देईल हरित इंधन

पर्यावरणीय संकटाचे काळवंडलेले ढग आपल्या सर्वांच्या डोक्यांवर दाटत आहेत. भू-राजकीय अस्थैर्याची त्यात भर पडत आहे. जगाची खनिज इंधनाची सर्वाधिक गरज भागवणारा आखाती प्रदेशच अस्थैर्याच्या खाईत लोटला आहे. दुसरीकडे, एका बाजूला विकासासाठी इंधनाची अपरिहार्यता आणि दुसऱ्या बाजूला जागतिक हवामान बदलांचे संकट टाळण्यासाठी खनिज इंधनाला पर्याय शोधण्याची गरज अशा कात्रीतून स्वतःची सुटका कशी करून घ्यायची, हा बहुसंख्य देशांपुढे निर्माण झालेला पेच आहे. ऊर्जा संक्रमण आणि त्यातून अक्षय ऊर्जेचा अंगीकार हेच त्यावरील एकमेव ठोस उत्तर आहे.

जागतिक हवामानशास्त्र संघटनेचा ‘स्टेट ऑफ द ग्लोबल क्लायमेट २०२५’ हा अहवाल नुकताच प्रकाशित झाला. त्यानुसार, २०१५ ते २०२५ हे दशक हवामान नोंदींच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण ठरले आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे : जी खनिज इंधने या तापमानवाढीला प्रामुख्याने कारणीभूत ठरत आहेत, त्यांवरील जगाचे अवलंबित्व आता विनाशाकडे घेऊन जाईल. कमी कर्बोत्सर्गी आणि अक्षय ऊर्जा स्रोतांकडे जगाला वळावेच लागेल. आणि हे संक्रमण दीर्घकालीन उद्दिष्ट न राहता जगाला तातडीने स्वीकारावे लागेल. भारताच्या बाबतीत सांगायचे, तर आपल्या खनिज तेल व वायू आयातीमध्ये आखाती देशांचा वाटा लक्षणीय आहे. युद्धस्थितीत या आयातीवर झालेला परिणाम आटोक्याबाहेर जाऊ नये, यासाठी आपल्या देशाला खास मोहीम राबवावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर, विकसित देश होण्याच्या दिशेने पावले टाकण्यासाठी भारतापुढील मार्ग स्पष्ट आहे : खनिज इंधनावरील आणि त्यातही आयात इंधनावरील अवलंबित्व किमान स्तरावर आणणे आणि त्याद्वारे आपल्या आर्थिक व सामरिक कमकुवतपणावर मात करणे हे आपल्यासाठी प्राधान्याचे ठरले आहे.

खनिज ऊर्जेकडून अक्षय स्रोतांकडील संक्रमणाचा कृतिकार्यक्रम भारताने यापूर्वीच हाती घेतला आहे. सद्यस्थितीत आपल्या देशाची स्थापित ऊर्जाक्षमता ५२४ गिगावॉट झाली असून, त्यांपैकी २८३ गिगावॉट ऊर्जानिर्मिती खनिजेतर स्रोतांपासून होत आहे. अक्षय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेच्या बाबतीत आपण आता ब्राझीलला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर पोचलो आहोत. चीन व अमेरिका याबाबतीत अद्याप आपल्या पुढे आहेत. अक्षय ऊर्जेच्या आता पारंपरिक म्हणता येतील अशा सौर व पवन या स्रोतांपलीकडे जाऊन अन्य काही पर्यायांचा विचार केंद्र सरकार करत आहे.

पृथ्वीच्या वातावरणात अर्धदशसहस्रांश एवढाच भाग हायड्रोजन वायूने व्यापलेला आहे. परंतु पृथ्वीचा ७१ टक्के भाग हा पाण्याने व्यापलेला आहे. याच ‘जीवन’ रूपातील हायड्रोजन ऑक्सिजनपासून वेगळा होऊन आपल्याला उपलब्ध झाला तर संपूर्ण जगाला प्रदूषणमुक्त जीवनाची दिशा दाखवू शकेल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

हरित हायड्रोजनचे उत्पादन सौर, पवन आणि जैवभार या अक्षय स्रोतांपासून केले जाऊ शकते. यातील जैवभाराचा पर्याय हा अनेकार्थांनी आपल्या देशहिताचा आहे. शेतातील जैवकचरा, वनकचरा, मळी, सांडपाणी, शहरी कचरा आदी जैवभार यासाठी वापरला जाऊ शकतो. त्यातून कर्बोत्सर्ग तर कमी होईलच, खेरीज नैसर्गिक वायूच्या रूपातील खनिज इंधनाच्या आयातीत आपण घट साधू शकू, जैवकचऱ्याच्या समस्येवर उपाय निघेल आणि ही उत्पादनप्रक्रिया देशांतर्गत होण्याने स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल. शेतीशी जोडलेली ग्रामीण अर्थव्यवस्था आणि ग्रामीण भागांतील रोजगारनिर्मिती यांना त्यातून बळ मिळेल. जैवभाराधारित वगळता अन्य कोणत्याही अक्षय ऊर्जा स्रोतांपासून हरित हायड्रोजनच्या निर्मितीसाठी मात्र इलेट्रोलायसिसची गरज असते. रासायनिक प्रक्रियेतून एखाद्या पदार्थाचे विघटन होत नाही, तेव्हा त्यामध्ये वीजभार सोडून ती प्रक्रिया पार पाडणे म्हणजे इलेट्रोलिसिस. अर्थात, त्या मार्गाने जावे लागले तरी भारतासाठी त्यातही काही जमेच्या बाजू आहेत. त्यांपैकी महत्त्वाची म्हणजे इलेक्ट्रोलायसिससाठी लागणारी वीज ही अक्षय ऊर्जेच्या स्वरूपात आपल्याकडे जागतिक बाजारपेठेतील सर्वांत कमी दरामध्ये उपलब्ध होऊ शकते. आपली प्रचंड विस्तारलेली स्थानिक बाजारपेठ ही दुसरी जमेची बाजू. आपल्या देशाच्या हरित हायड्रोजन उपक्रमातील उत्पादन व वापर यांपलीकडील तिसरा मुद्दा म्हणजे निर्यात. दीर्घ काळासाठीची साठवण क्षमता ही याबाबतीत हरित हायड्रोजनची जमेची बाजू ठरू शकते.

**– डॉ. रवींद्र उटगीकर**

# व्हीआयपी मानसन्मान बाबासाहेबांनी दिला!

भीम जयंती १३५ ची धामधूम सुरू असताना एक फ्लेक्स सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. या फ्लेक्समधील चित्रात एका बाजूला पूर्वाश्रमीचे अस्पृश्य लोक अंगाभोवती तोकडे कपडे गुंडाळून उभे असल्याचे दाखवले आहे. त्यांच्या हातात पारंपरिक अवजारे, जसे की कुदळ, फावडे, नांगर इत्यादी दिसत आहेत. ऊन, वारा आणि पावसाने त्यांचे चेहरे करपलेले आहेत. चेहऱ्यावर भय, दुःख आणि चिंता स्पष्ट दिसत आहे. अज्ञान आणि अस्तित्वाच्या संघर्षामुळे त्यांचे जीवन गुलामगिरीचे बनले आहे. रानावनात उभे राहिलेले हे सर्व लोक पशुवत जीवन जगत असल्याचे चित्रात स्पष्ट दिसते.

या सर्वांमध्ये परिवर्तन घडवणारा क्रांतीसूर्य, अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तेजस्वी, प्रखर आणि विचारदर्शी प्रतिमा मधोमध आहे. त्यांच्या उजव्या बाजूस डॉक्टर, इंजिनिअर, वकील, वैमानिक आणि इतर उच्चविद्याविभूषित स्त्री-पुरुषांची चित्रे आहेत. अर्थातच हे सर्व लोक पूर्वाश्रमीचे अस्पृश्य आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य, आत्मविश्वास आणि निर्भयता स्पष्ट दिसते. शिक्षणामुळे आलेली जाणीव, सुबुद्धी आणि प्रगल्भता त्यांच्या चेहऱ्यावर उठून दिसत आहे.

पूर्वीचे अस्पृश्य लोक पशुवत जीवन जगत होते; आज ते सन्मानाचे जीवन जगत आहेत. परिवर्तनाचे खरे खुरे चित्र या फ्लेक्स वर पाहायला मिळत आहे. अस्पृश्यांच्या जगण्याला वैचारिक अधिष्ठान



देणारा, त्यांच्या जीवनाचे सोने करणारा आणि त्यांना आत्मभान मिळवून देणाऱ्या उद्धारकर्त्याच्या जयंतीनिमित्त उभे केलेले हे चित्र हजारो शब्दांचे वर्णन करण्यास पुरेसे आहे.

व्हीआयपी राहणं, व्हीआयपी खानं आणि व्हीआयपी मानसन्मान बाबासाहेबांनं दिलं बाबासाहेबांनं... हे गीत या फ्लेक्ससमोरून जाताना मनात मोठ्याने घुमू लागले. अंग शहारले, डोळे पाणावले आणि बाबासाहेबांच्या या उपकारांपुढे नतमस्तक होण्यासाठी हात आपसूकच जोडले गेले.

अस्पृश्य लोकांना अंगभर कपडे मिळत नव्हते. गावातून उष्टे अन्न मागून आणावे लागत होते. गावकीची कामे करावी लागत होती. मेलेली जनावरे ओढून आणावी लागत होती. त्यांच्या स्पर्शाचाच नव्हे, तर सावलीचाही विटाळ मानला जात होता. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरता येत नसल्यामुळे महिलांना दूरवर जाऊन पाणी आणावे लागत होते.हे सर्व आज थांबले आहे; नव्हे कायद्यांनी ते थांबवले आहे. हजारो वर्षे कोणाच्याही मनात अस्पृश्यांबद्दल करुणा निर्माण झाली नाही. कोणीही अस्पृश्यांना माणसांत आणण्याचा प्रयत्न केला नाही. महात्मा ज्योतिबा फुले यांना या सर्व अस्पृश्यांबद्दल कळवळा वाटला. त्यांनी आपले सारे आयुष्य अस्पृश्य उद्धारासाठी खर्ची घातले. त्यांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. स्वतः च्या घरासमोरील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.त्यांच्या कार्याला व्यापक रूप देत छत्रपती शाहू महाराज आणि पुढे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजाच्या संपूर्ण पिढ्यांचाच उद्धार केला. घटनाकार म्हणून बाबासाहेबांनी अस्पृश्यतेवर कायद्याने बंदी आणली. जातीय अत्याचारांविरुद्ध कठोर कायदे निर्माण झाले. नोकऱ्यांमध्ये आणि शिक्षणासाठी आरक्षणाची तरतूद केली. राजकीय प्रतिनिधित्वासाठी राखीव जागांची व्यवस्था केली. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा क्रांतीचा नारा दिला. जगण्यासाठी समर्थ होणारा समाज बाबासाहेबांनी अपार कष्टातून निर्माण केला. उच्च शिक्षण, वरिष्ठ नोकऱ्या आणि सन्माननीय उपजीविकेचे मार्ग यामुळेच अस्पृश्यांची उन्नती होईल, हे त्यांचे म्हणणे आज सत्यात उतरले आहे.

१९३६ साली मुंबई इलाखा महार परिषदेत भाषण करताना त्यांनी सांगितले होते की, अस्पृश्य समाज ज्ञान, द्रव्य आणि मनुष्यबळ या तीन बाबतीत दुर्बल आहे; हे प्राप्त केल्याशिवाय त्यांची उन्नती होणार नाही. त्यांनी दिलेला हा रोडमॅप आज जो पूर्वाश्रमीचा अस्पृश्य बांधव स्वीकारतो, तो प्रगतीपथावर पोहोचत आहे.

आपली वैयक्तिक भूमिका स्पष्ट करताना बाबासाहेब वेळोवेळी म्हणाले होते की, जेव्हा जेव्हा माझे वैयक्तिक हित आणि देशहित यांत संघर्ष निर्माण होईल, तेव्हा मी देशहिताला प्राधान्य देईन; परंतु मी माझ्या समाजाच्या निष्ठेलाही बांधील आहे. जीवात जीव असेपर्यंत मी अस्पृश्यांना अंतर देणार नाही. हे वचन त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत पाळले.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने काय साधले? तर स्वाभिमान, स्वावलंबन, माणुसकीचा आग्रह, लाचार होऊन न जगणे, भारतीय म्हणून सर्व क्षेत्रांत अधिकार मिळवण्याचा आग्रह, स्वतःचा मार्ग स्वतः चोखाळणे, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक समतेसाठी लढा देणे. हे सर्व मिळून एक उच्च दर्जाचे, सन्मानाचे जीवनअर्थातच व्हीआयपी जीवनआज आम्ही जगत आहोत.थश रऑश लशलरींश हश्‌ुरी! अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणारा हा जयंती उत्सव चिरायू ठेवण्याचा प्रयत्न आपण करूया...

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा अद्वितीय संगम - ‘भगवान परशुराम’ !

अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः । इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ।। अर्थात ज्याच्या मुखात चार वेद आहेत आणि पाठीवर धनुष्य बाण आहे, ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज ज्याठिकाणी एकत्रित आहेत. विरोध करणाऱ्यांना शापाने आणि प्रसंगी शराने म्हणजेच बाणाने नष्ट करण्याचे ज्यामध्ये सामर्थ्य आहे असे भगवान पशुराम श्रीविष्णूचा सहावा अवतार. श्रीविष्णूचा परशुराम हा एकमेव अवतार आहे जो अमर्त्य म्हणजेच चिरंजीव आहे. आजही एखादी व्यक्ती अत्यंत क्रोधीत झाली की तिला जमदग्नीची उपमा दिली जाते. अशा जमदग्नी ऋषी आणि माता रेणुका यांच्या पोटी भगवान परशुरामांचा जन्म झाला. त्यांचे नाव राम असे ठेवण्यात आले. ते भगवान शिवाचे परमभक्त होते. आपल्या तपसामर्थ्याने त्यांनी भगवान शिवांना प्रसन्न करून घेतले होते. भगवान शिवांनी त्यांना दुष्टांच्या संहारासाठी परशु दिला होता तेव्हापासून त्यांच्या नावापुढे परशु लागून ते परशुराम झाले. वडिलांप्रमाणे परशुराम सुद्धा शीघ्रकोपी होते; मात्र वडिलांप्रमाणेच त्यांचा राग पुढच्या क्षणाला शांतही होत असे. संपूर्ण कोकणप्रांतात भगवान पशुरामांची अनेक मंदिरे आणि पौराणिक संदर्भ सापडतात. त्यामुळे कोकणभूमीला परशुराम भूमी म्हणूनही संबोधले जाते. भगवान पशुरामांविषयी मुख्यतः दोन गैरसमज समाजामध्ये आढळतात. हे गैरसमज खरे आहेत का किंवा यामागील नेमकी कारणमीमांसा काय आहे याविषयी थोडक्यात जाणून घेऊया !

भगवान परशुरामांविषयी पहिला गैरसमज आहे तो म्हणजे भगवान परशुरामांनी आपल्या आईचा शिरच्छेद केला. होय भगवान परशुरामांनी त्यांच्या जन्मदात्या आईचा शिरच्छेद केला हे जरी सत्य असले, तरी त्यांना पुनर्जीवित करण्यामागेही त्यांचाच प्रमुख हात होता. एकदा जमदग्नी ऋषींनी एका यज्ञाचे अनुष्ठान आरंभले होते. त्यासाठी हवे असलेले जल त्यांनी पत्नी रेणुका यांना नदीवरून घेऊन येण्यास सांगितले. माता रेणुका कुंभ घेऊन नदीवर जल घेण्यासाठी गेल्या असता त्यांना त्याठिकाणी गंधर्व आणि अप्सरा जलक्रीडा करत असल्याचे दिसले. ते पाहिल्यावर त्या देहभान हरपून ते दृश्य पाहत बसल्या. नदीवर त्या नेमक्या कशासाठी आल्या होत्या तेच त्या विसरल्या. जेव्हा भानावर आल्या तेव्हा बराच उशीर झाला होता. जल मिळण्यास विलंब झाल्याने जमदग्नी ऋषींना यज्ञ करता आला नाही. शीघ्रकोपी असलेले जमदग्नी भयंकर क्रोधीत झाले आणि त्यांनी आपल्या चारही पुत्रांना मातेचा शिरच्छेद करण्यास सांगितले. काय करावे सुचेना म्हणून अन्य तीन मुले खाली मान घालून उभी राहिली; मात्र परशुरामांनी शिरच्छेद करण्यासाठी शस्त्र हाती घेतले. आपल्या वडिलांना ते चांगलेच ओळखून होते. या प्रसंगातून ते आपली परीक्षा घेत आहेत हे त्यांच्या लक्षात आले. वडिलांना क्रोध आला असला, तरी पुढच्याच क्षणी तो शांत होईल आणि आईला ते मंत्रसामर्थ्याने पुनर्जीवित करू शकतात हे ज्ञात असल्यानेच पशुरामांनी



मातेचा शिरच्छेद केला. मुलाच्या आज्ञापालनाने प्रसन्न झालेल्या जमदग्नी ऋषींनी परशुरामांना तीन वर मागण्यास सांगितले. त्यांनी तत्क्षणी मातेला जीवित करण्यास सांगितले. जमदग्नी ऋषींनी मंत्रजल शिंपडून रेणुका मातेला जिवंत केले. भगवान परशुरामांविषयी दुसरा गैरसमज पसरवला गेला आहे तो म्हणजे परशुरामांनी २१ वेळा पृथ्वीप्रदक्षिणा करून २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली. भगवान परशुराम हे क्षत्रिय विरोधी होते. भगवान परशुरामांच्या या कृतिमध्येच प्रश्नाचे उत्तरसुद्धा आहे. भगवान परशुरामांनी एकदा जरी पृथ्वी खरोखरच नि:क्षत्रीय केली असती, तर दुसऱ्यांदा ती नि:क्षत्रीय करण्यासाठी एकही क्षत्रिय जिवंत राहिला असता का ? भगवान परशुरामांनी केवळ सत्तेने, सामर्थ्याने आणि मदाने उन्मत्त झालेल्या, प्रजेवर जुलूम करणाऱ्या क्षत्रियांचाच निःपात केला. परशुरामाचा अवतारच मुळात उन्मत्त क्षत्रियांच्या विनाशासाठी झाला होता. भगवान परशुरामाच्या या कृतीमागेही एक कथा आहे. एके दिवशी भगवान परशुराम बाहेर गेले असता राजा सहस्त्रबाहू याचे दोन पुत्र कृतवीर अर्जुन आणि कार्तवीर्य अर्जुन जमदग्नी ऋषींच्या आश्रमात आले आणि त्यांनी आश्रमातील कामधेनूचे अपहरण केले. साधनेत मग्न असलेल्या जमदग्न ऋषींवरही त्यांनी प्रहार करून त्यांना ठार केले. पतिनिधनानंतर माता रेणुका सती गेल्या. भगवान परशुराम आश्रमात परतल्यानंतर त्यांना सर्व प्रकार कळला. वडिलांचा घात करणाऱ्या सहस्त्रबाहूच्या दोन्ही पुत्रांसह पृथ्वीतलावरील समस्त दुष्ट क्षत्रियांचा नाश करण्याचा त्यांनी निश्चय केला. दुष्ट आणि अत्याचारी क्षत्रियांचा नाश केल्यावर त्यांच्या पुढच्या पिढ्याही अत्याचारी निपजत असल्याचे लक्षात आल्यावर परशुराम त्यांचाही वध करत गेले. असे करत करत त्यांनी पृथ्वीतलावरील राजधर्म विसरलेल्या, सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्या उन्मत्त आणि अत्याचारी क्षत्रियांचा २१ वेळा निःपात केला. प्रजेचे कल्याण साधणाऱ्या, प्रजेवर पुत्रवत प्रेम करणाऱ्या आणि प्रजेच्या उद्धारासाठी झटणाऱ्या एकही क्षत्रिय राजाला भगवान परशुरामांनी कधी स्पर्शही केला नाही. यावरून भगवान परशुराम कधीही क्षत्रियविरोधी नव्हते हे लक्षात येते. त्रेतायुगात सीता स्वयंवराच्या प्रसंगी भगवान पशुरामांची भेट प्रभू रामचंद्रांशी झाली. प्रभू राम चंद्र हे क्षत्रिय आहेत आणि भगवान विष्णूचे अवतार आहेत. श्री विष्णूंनी दुष्टांच्या संहारासाठीच प्रभूरामचंद्राचा अवतार घेतल्याचे लक्षात आल्यावर भगवान परशुरामांनी आपले कार्य थांबवले आणि तपासाठी निघून गेले. द्वापारयुगात त्यांनी पितामह भीष्म, द्रोणाचार्य आणि कर्ण यांना प्रशिक्षण दिले. अशा जगाच्या कल्याणासाठी पृथ्वीतलावर अवतरलेल्या भगवान परशुरामांना त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## अक्षय त्रितीया

मुहूर्त शुभ साडे तीन
अक्षय त्रितीयेचासण
वैशाख शुद्ध तृतीया
महत्वाचा सुवर्ण दिन

महाभारत ग्रंथलेखन
व्यास वदे श्रीगजानन
त्रेता युग प्रारंभ झाले
कृत युग आज सरून

महाभारत युध्द सरे
कौरव जाय यमसदन
युध्द कधी नसे भले
रणांगणाचे मूकरूदन

बाके बिहारी मंदिरात
श्री विग्रह दिसे चरण
आज करू गंगा स्नान
तन मन शुध्दी करण

महात्माशी बसवेश्वर
जाण मौल् शिकवण
साजराहोई जन्मदिन
वीर शैवा गीताचरण

इदं ब्राह्मं न् इदं क्षात्रं
परशुराम श्री भगवान
रेणुकाईचा समर्थ पुत्र
गुरू योध्दा शक्तीवान

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# सामाजिक क्रांतीचे जनक : महात्मा बसवेश्वर

सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर यांची आज जयंती. दरवर्षी अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी केली जाते. महात्मा बसवेश्वर यांचा जन्म ११०५ मध्ये झाला. महात्मा बसवेश्वर हे बिज्जल राज्याच्या दरबारात महामंत्री होते. महात्मा बसवेश्वर यांना सामाजिक क्रांतीचे जनक असे म्हणतात कारण त्यांनी प्रचलित सनातनी धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, स्त्री-पुरुष, उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव यासारख्या कुप्रथांच्या विरोधात बंड पुकारले. हे बंड म्हणजे माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारणाऱ्या संस्कृती विरुद्ध पुकारलेला एल्गार होता. या बंडात सामाजिक क्रांतीची बीजे पेरली गेली होती. बाराव्या शतकात भारताचे समाज जीवन अंधकारमय झाले होते. समाजात अंधश्रद्धा, कर्मकांड, भेदभाव वाढत चालला होता. बहुदेवता उपासना, पुरोहित वर्गाची मक्तेदारी, पाप पुण्याची दहशत, उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री- पुरुष भेदभाव इत्यादींनी भारतीय समाजमन बेजार झाले होते. अशा वेळी भारतीय समाजमन जागृत करुन माणसाला माणूसपण मिळवून देण्याचे काम महात्मा बसवेश्वर यांनी केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन समाजसत्तेशी, राज सत्तेशी मोठा संघर्ष करावा लागला. माणूस हा जन्माने नव्हे तर कर्माने मोठा होतो अशी त्यांची धारणा होती म्हणूनच तत्कालीन व्यवस्था बदलून नवी समाजव्यवस्था त्यांचे निर्माण केली. जिथे उच्च-नीच, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्त्री-पुरुष, जात-पात असा कुठलाही भेदभाव नाही, विषमता नाही. कर्मकांड, अंधश्रद्धा नाही अशी समाजव्यवस्था महात्मा बसवेश्वर यांनी आपल्या अलौकिक विचारधारेतून आणून दाखवली म्हणूनच त्यांना दक्षिणेतील गौतम बुद्ध असे म्हणतात. प्रत्येकाने कर्म करूनच जगले पाहिजे. जन्माच्या आधारे भेदभाव नाही. या त्यांच्या या विचारांची अंमलबजावणी पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात केली. जगातील पहिली संसद असे ज्याचे वर्णन केले जाते ती अनुभव मंटप नावाची परंपरा त्यांनी सुरू केली. अनुभव मंटप हे असे सार्वजनिक ठिकाण होते जिथे सर्व समाज घटकांतील स्त्री पुरुष एकत्र बसून आपआपले अनुभव सांगत आणि त्यातून समाज म्हणून एकत्रितपणे पुढे जाण्याचे नियम ठरत. महात्मा बसवेश्वरांचे एक वचन आहे. कायकवे कैलास कैलास म्हणजे मोक्ष, म्हणजे काम केल्यानेच मोक्ष मिळतो. मोक्ष मिळवण्यासाठी कुठल्याही कर्मकांडाची गरज नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या सहकार्याच्या मुलगा आणि मुलीच्या विवाहास समर्थन दिले जो आंतरजातीय विवाह होता. मुलगा हा चांभार समाजाचा तर मुलगी ब्राह्मण समाजाची होती. महात्मा बसवेश्वरांच्या या सुधारणावादी, समतावादी कार्याने खवळलेल्या सनातन्यांनी या घटनेचे भांडवल करून लोकांना भडकवले आणि दुसऱ्या बाजुला राजा बिज्जलचा खून करुन त्याचा आळ महात्मा बसवेश्वरांवर आणला. सहकाऱ्यांच्या आग्रहास्तव महात्मा बसवेश्वर जीव वाचवण्यासाठी तेथून पळाले पण सनातन्यांनी अनेक शरण, शरणार्थ्यांची हत्या केली. त्यांनतर महात्मा बसवेश्वरांनी पुन्हा समतावादी लिंगायत धर्माची परंपरा वाढवण्याचा प्रयत्न केला. महात्मा बसवेश्वर यांचे समतावादी, सुधारणावादी विचार आपल्या जीवनात आचरणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. जयंतीदिनी महात्मा बसवेश्वर यांना विनम्र अभिवादन!

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# इतिहासाच्या पाऊलवाटेवर 'बहुसांस्कृतिक ठाणे'

## संस्कृतीचा संगम आणि इतिहासाची साद; ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाचा अनोखा 'हेरिटेज वॉक'

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१८, ठाणे :** १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या विशेष दिवसानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने बहु सांस्कृतिक ठाणे या हेरिटेज वॉक (Heritage Walk) चे आयोजन करण्यात आले होते. या हेरिटेज वॉकची सुरुवात सुप्रसिद्ध पुरातन कोपिनेश्वर मंदिरापासून करण्यात आली, त्यानंतर मासुंदा तलाव, सेंट जॉन बाप्टिस्ट चर्च, पारसी सिनेगॉग, जैन मंदिर, मुस्लिम धर्मियांचे सामाजिक भवन या ठिकाणी भेट देऊन शेवटी समारोप टाऊन हॉल येथे करण्यात आला.

या हेरिटेज वॉकमध्ये अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी शशिकांत गायकवाड, कल्याण प्रांताधिकारी विश्वास गुजर, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी उज्वला सपकाळे, तहसिलदार सचिन चौधर, अमोल कदम, उमेश पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.अनिता जवंजाळ, ठाणे मनपा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासिन तडवी, जिल्हाधिकारी महोदयांचे स्वीय सहायक गिरीश काळे,



आर्किऑलॉजिस्ट गौरी काळे, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या अद्वैता मांगले, क्रीडा मार्गदर्शक श्रद्धा तळेकर आदी अधिकारी उपस्थित होते.

या हेरिटेज वॉक दरम्यान संदेश अवडण यांनी मार्गदर्शकाची भूमिका अत्यंत चोख बजावली. भेट दिलेल्या प्रत्येक वास्तूचे ऐतिहासिक महत्त्व, त्या वास्तूविषयीची वस्तुनिष्ठ माहिती, त्याचे संदर्भ अशी वैविध्यपूर्ण माहिती त्यांनी यावेळी दिली. त्यांना जेष्ठ इतिहास अभ्यासक सदाशिव तेटविलकर, इंटॅक च्या सहसंयोजक ॲड.दिव्या ठाकूर, सिने अभ्यासक संतोष पाठारे, दूरदर्शनच्या प्रसिद्ध निवेदिका मानसी आमडेकर, कार्यक्रम छायाचित्रकार जय मनोरे या सर्वांची मोलाची साथ लाभली.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या हेरिटेज वॉकचे अतिशय उत्कृष्ट नियोजन तहसिलदार सचिन चौधर आणि अश्वमेध प्रतिष्ठान चे संस्थापक, पुरातत्व अभ्यासक व मानद वन्यजीव संरक्षक, महाराष्ट्र राज्य अविनाश हरड यांनी केले.

# कोल्हारच्या प्रतिक बनसोडेची दैदिप्यमान कामगिरी; एमपीएससीत राज्यात १७ वा क्रमांक

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१८, राहुरी :** तालुक्यातील कोल्हार खुर्द या ग्रामीण भागातील प्रतिक मनीषा संतोष बनसोडे याने आपल्या जिद्दी, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) स्पर्धा परीक्षेत राज्यात १७ वा क्रमांक पटकावत त्याने नगर रचना अधिकारी (श्रेणी-१) या राजपत्रित पदावर आपले नाव कोरले आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतून येत अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून मिळविलेले हे यश विशेष प्रेरणादायी ठरत आहे.

प्रतिकच्या या यशामुळे कोल्हार खुर्द गावासह संपूर्ण राहुरी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामस्थ, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांनी त्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्षमता कमी नसते, फक्त योग्य दिशा आणि प्रामाणिक प्रयत्नांची गरज असते, हे प्रतिकच्या यशातून अधोरेखित झाले आहे. अत्यल्प खाजगी मार्गदर्शन घेत, स्वअभ्यासावर भर देत आणि नियोजनबद्ध तयारी करत त्याने हे यश



संपादन केले. आई-वडिलांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे मोलाचे सहकार्य आणि स्वतः वरील विश्वास यामुळेच हे शक्य झाले, अशी नम्र प्रतिक्रिया प्रतिकने व्यक्त केली. अभ्यास करताना विषय समजून घेण्यावर आणि आत्मसात करण्यावर भर दिल्यामुळेच पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळविता आले, असेही त्याने सांगितले. त्याच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असून स्पर्धा परीक्षांकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होण्यास मदत होत आहे.

युवा ग्रामीण पत्रकार संघासह विविध संघटनांनी त्याचा सत्कार करण्याचा निर्णय घेतला असून, आगामी काळात तो प्रशासनात उत्तम कार्य करून समाजाच्या विकासात मोलाचे योगदान देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# चंद्रपूरकरांकडून विनय गौडा जी. सी. यांचा आज भव्य नागरी सत्कार

## नव्या जिल्हाधिकारी वसूमना पंत देखील होणार सन्मानित

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाला नवे आयाम देत प्रशासनाला लोकाभिमुखतेची धार देणारे नुकतेच बदली झालेले जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांचे योगदान चंद्रपूरकरांच्या मनात अढळ स्थान निर्माण करून गेले आहे.

त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी घेतलेल्या निर्णयांची आणि राबवलेल्या उपक्रमांची आठवण आजही नागरिक अभिमानाने करतात. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या विकास प्रकल्पाना प्रशासकीय पातळीवर त्यांनी केलेल्या सकारात्मक सहकार्यामुळे विकास प्रक्रियेला गती मिळाली आहे. या कर्तृत्वाला मानाचा मुजरा देण्यासाठी चंद्रपूरकर नागरिकांच्या वतीने त्यांच्या सन्मानार्थ भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह येथे उत्साहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार राहणार असून, कार्यक्रमाला आ. कीर्तिकुमार भांगडिया, आ. देवराव भोंगळे, आ. करण देवतळे या मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. विविध सामाजिक संस्था



संघटनांच्या माध्यमातून त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

याचवेळी चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासाची धुरा नुकतीच स्वीकारलेल्या जिल्हाधिकारी श्रीमती वसूमना पंत यांचाही शुभेच्छापर नागरी सत्कार करण्यात येणार आहे. नव्या जबाबदारीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या आगामी कार्यासाठी नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होणार आहे. दोन्ही कार्यक्षम आणि लोकाभिमुख सनदी अधिकाऱ्यांच्या सन्मानार्थ आयोजित हा नागरी सत्कार सोहळा चंद्रपूरच्या सामाजिक ऐक्याचे आणि कृतज्ञतेच्या भावनेचे प्रतीक ठरणार आहे. या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी चंद्रपूरकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# पालघरच्या वनीता उराडे यांचा नर्सरी व्यवसायातील गगनभरारी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, पालघर :** जिद्द, मेहनत आणि योग्य दिशा मिळाली की यशाचे शिखर सहज सर करता येते, हे पालघर जिल्ह्यातील रोठे (केळवा रोड) येथील सौ. वनीता विनोद उराडे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. केवळ १० वी पर्यंत शिक्षण झालेल्या वनीता ताईंनी घरची बेताची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी उचललेले पाऊल आज एका यशस्वी व्यवसायात रूपांतरित झाले असून, केंद्र आणि राज्य शासनाच्या महिला सक्षमीकरण मोहिमेचे त्या एक चालते-बोलते उदाहरण बनल्या आहेत.

सुरुवातीला शेती कामात गुंतलेल्या वनीता ताईंना स्वतःचा काहीतरी स्वतंत्र व्यवसाय असावा, अशी तीव्र इच्छा होती. ही संधी त्यांना स्वयं सहायता गट आणि ईएपी कार्यक्रमाच्या माध्यमातून



मिळाली. याद्वारे त्यांना ठाणे येथील 'महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थे'ची माहिती मिळाली. याच संस्थेत त्यांनी २३ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत 'पॉली हाऊस आणि शेड नेट शेती' या विषयावर १० दिवसांचे सखोल प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणाने त्यांच्यातील सुप्त कौशल्याला वाव दिलाच, पण त्यासोबतच आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि व्यवसाय व्यवस्थापनाचा नवा दृष्टीकोनही दिला.

प्रशिक्षण पूर्ण होताच त्यांनी वेळ न घालवता २७ फेब्रुवारी २०२३ रोजी आपल्या स्वप्नाला मूर्त रूप दिले. सुमारे १ लाख ५ हजार रुपयांच्या गुंतवणुकीतून त्यांनी 'वर्मी कंपोस्ट आणि नर्सरी' व्यवसायाचा श्रीगणेशा केला. बँकिंग कर्जाच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास अधिक दुणावला. आज त्यांच्या रोपवाटिकेमध्ये विविध प्रकारची झाडे आणि उच्च दर्जाचे गांडूळ खत उपलब्ध असून, ग्राहकांच्या पसंतीस उतरल्यामुळे त्यांचा हा व्यवसाय अल्पावधीतच स्थिरावला आहे.

एकेकाळी केवळ गृहिणी आणि शेतकरी म्हणून वावरणाऱ्या वनीता ताई आज दरमहा १७ हजार रुपयांहून अधिक उत्पन्न मिळवत आहेत. केवळ स्वतःसाठी रोजगार निर्माण न करता, त्यांनी आपल्या कुटुंबाला एक भक्कम आर्थिक आधार दिला आहे. या प्रवासात त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला बदल लक्षणीय आहे; वाढलेला आत्मविश्वास, प्राप्त झालेले स्वावलंबन आणि समाजात निर्माण झालेली एक यशस्वी उद्योजिका ही ओळख त्यांच्या कष्टाचे फळ आहे. भविष्यात आपल्या व्यवसायाचा विस्तार करून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे त्यांचे स्वप्न असून, त्यांचा हा यशस्वी प्रवास पालघरमधील शेकडो महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# थोडक्यात

## पिंपरी गवळीचा शुभंम थोरात ला एम.बी.बी.एस पदवी प्रदान




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१८, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील पिंपरी गवळी येथील मेजर अरुण ज्ञानदेव थोरात यांनी देशसेवेत नोकरी करुन आपल्या आपत्यांना जिद्द, चिकाटी आणि संस्कृतीची ओळख पटवुन दिल्यामुळे आज त्यांचा मुलगा शुभंम हा एम.बी.बी.एस पदवी घेउन आई वडीलांचे स्वप्न त्याने पूर्ण केल्याचे वास्तव चित्र आज पहावयास मिळते. शुभंम हा पहीली ते बारावी शिक्षण त्याने केंद्रीय विद्यालय पंजाब येथे पुर्ण करुन नेटची परीक्षा ही उतीर्ण होउन त्याने गव्हर्मेंट मेडीकल कॉलेज संभाजी नगर येथे आपल्या जिद्द आणी चिकाटीच्या जोरावर एम.बी.बी.एस पुर्ण करुन डिग्री प्राप्त केली, त्याच्या यशामागे, त्याचे आई वडीलांचे मोठे योगदान समजावे लागेल,वडीलांनी देशसेवा करीत असतांना आपल्या मुलाला शिक्षणाचा पाया म्हणजे काय? जिद्द आणी चिकाटी अंगी कशी जोपासायची ते त्यांनी मुलाला शिकवले,आई वडीलांचे संस्कार चांगले मिळाल्यामुळे ,मुलाची मानसिक शक्ती वाढल्याने ,जिद्द उराशी बाळगुन शेवटी शुभंम हा यशाच्या शिखरावर पोहचला. शुभंम याला एम ,बी,बी,एस, ही पदवी मिळाल्याने वडीलांचे दिर्घकालीन स्वप्न साकार झाल्याचे वास्तव चित्र आज त्याच्या आई वडीलांना पहावयास मिळाले, शुभंम याला एम,बी,बी,एस पदवी मिळाल्याने पिंपरी गवळी गावात आनंदाचा वर्षाव झालेचे चित्र पहावयास मिळाले. गावचे सरपंच पंडीत थोरात ,किसन मांडगे ,डि,एन,थोरात, रघुनाथ चहाळ, लालकृष्ण भालशिंग,पारनेर दुध संघाचे रामचंद्र मांडगे, पारनेर तालुका भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, राजकुमार इकडे (पत्रकार) व पंचक्रोशीतील सर्व ग्रामपंचायती, चेअरमन, सदश्य यांनी अभिनंदन केले आहे.

## समाज माध्यमातील जाहिरातींवर विश्वास ठेवू नये - विभाग प्रमुख डॉ.हिले

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१८, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ, दि.१८ एप्रिल २०२६ रोजी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील कृषी अर्थशास्त्र विभागांतर्गत बहुव्यापक योजना कार्यरत आहे. सदर योजनेअंतर्गत कंत्राटी/कराराधारित पदभरतीसंदर्भात फेब्रुवारी महिन्यात विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र, राहुरी विधानसभा मतदारसंघातील आचारसंहितेमुळे सदर पदभरती प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून, आचारसंहिता उठल्यानंतरच पुढील प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. याबाबतचे सुधारित पत्रक (Corrigendum) विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

दरम्यान, काही समाज माध्यमांद्वारे या भरती प्रक्रियेबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. सदर भरती ही केवळ कराराधारित असूनही ती शासनाची कायमस्वरूपी भरती असल्याचा चुकीचा प्रचार केला जात आहे. तसेच, निवड प्रक्रियेत सर्व अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल असेही चुकीचे दर्शविण्यात येत आहे. प्रत्यक्षात, अधिसूचनेनुसार उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव व संबंधित क्षेत्रातील विशेष कामगिरी या निकषांवर गुणांकन करून अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. त्यानंतर १:३ या प्रमाणात (प्रत्येक पदासाठी ३ उमेदवार) पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

समाज माध्यमांवरील अशा चुकीच्या माहितीमुळे उमेदवार व त्यांच्या पालकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. त्यामुळे इच्छुकांनी केवळ महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरील माहितीवरच विश्वास ठेवावा व अधिक माहितीसाठी तेथेच भेट द्यावी, असे आवाहन कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले यांनी केले आहे.

## गाव कृती आराखड्यावर आरोग्य संपन्न गावाचा संकल्प करा डॉ.आशा साळवे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१८, विसापूर (चंद्रपूर) :** नागरिकांना सुलभ आरोग्य सेवा मिळणे क्रमप्राप्त आहे. याच अनुषंगाने राज्यस्तरीय आरोग्य संपन्न अभियान सुरु करण्यात आले आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर आरोग्य संपन्न गाव कृती संनियंत्रण समिती कार्य करणार असून त्या माध्यमातून आरोग्य सेवांची स्थिती, अडचणी व सुधारणेसाठी उपाययोजना करावयाची आहे. गाव कृती आराखड्यावर आरोग्य संपन्न गावाचा संकल्प प्रामाणिकपणे यशस्वी करा, असे प्रतिपादन बल्लारपूर तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. आशा साळवे यांनी केले.

बल्लारपूर तालुक्यातील विसापूर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने उपकेंद्र नांदगाव (पोडे) व शिवणी येथील आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या यांची कार्यशाळा विसापूर आरोग्य केंद्रात पार पडली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विसापूरच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी कांबळे, तर उदघाटक म्हणून तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. आशा साळवे, प्रमुख अतिथी उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, वैद्यकीय अधिकारी प्रशांत मांडवे, डॉ. आदित्य तिवारी, केदारपवार यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. अश्विनी कांबळे म्हणाल्या, माझं गाव, आरोग्य संपन्न गाव, हे महत्वकांक्षी अभियान आहे. याची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. गावातील लोकसहभाग देखील महत्वाचा आहे. गाव संनियंत्रण कृती समितीचे कार्य व सहकार्याशिवाय आरोग्य संपन्न गाव यशस्वी होणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे आवाहन डॉ. अश्विनी कांबळे यांनी केले.